# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक १६.९.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १६ सप्टेंबर २००५ रोजी मा.महापौर श्री. किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी ४.०० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२७. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मीन बेगम अ.कदीर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३८. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बीन सईद
४८. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४९. स.स.श्री.मोतीवाला अशरफ मो.युनुस
५०. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५६. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५८. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५९. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६०. स.स.श्री.खुडे विजय किसन
६१. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६२. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६३. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६५. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६६. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७०. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
७१. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७२. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७३. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७४. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप

७५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
७७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८२. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८३. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
८४. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**संवाद :**

श्री.देसरडा प्रशांत :मागिल बैठकीत वार्ड क्र ५४ मधे महानगरपालिकेच्या पाईपलाईन फुटल्या मूळे नागरीकाचे नुकसान झालेले होते व त्या संदर्भात नुकसान भरपाई देण्या संदर्भात प्रशासनास आदेश केलेले होते सदरील नागरीक धनादेश घेण्यासाठी बाहेर उपस्थित आहे.

श्री.सलीम खान :चिकलठाणा. जाफरगेट पीरबाजार या बाजाराचा ठेका दिला जात असे आता स्वत:महानगरपालिके मार्फत वसूली करण्यात येत आहे उत्पन्न वाढले की कमी झाले याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :मागिल बैठकीत स.सदस्य श्री. देसरडा यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयासंदर्भात प्रशासनास तसा प्रस्ताव ठेवण्या बाबत आदेशित करण्यात आलेले होते.तसा प्रस्ताव सादर केलेला नाही. का केला नाही खुलासा देण्यात यावा.

कार्य.अभियंता(पापू) :ज्या वेळेस ही घटना घडली त्या वेळेस संचिका केलेली आहे त्यावेळेस आर्थिक तरतूद नसल्यामूळे त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. मागिल सभेत ठरल्या प्रमाणे पूर्ण शहरात अशा घटना वारंवार घडतात त्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

श्री.देसरडा प्रशांत :ही घटना माझ्या वार्डात २००२ मध्ये घडली त्यावेळी ठराव घेण्यात आला होता त्यावेळी दुसऱ्या एका वार्डाचा नुकसान भरपाई देण्याचा ठराव होता त्या ठरावानुसार त्या लोकांना नुकसान भरपाई देण्यात आली ती कशाच्या अधारे दिली ज्या लोकांचे नुकसान झाले त्या संबधी पंचनामा झालेला आहे सर्व रेकॉर्ड महानगरपालिकेकडे आहे

श्री.सिताराम सुरे :मागिल बैठकीत आदेश केल्यानुसार माझ्या वार्डातील अनाधिकृत बांधकाम पाडण्यात आले त्या बद्दल मा.महापौर यांचे आभार. तसेच वार्डात अनधिकृत मटन मार्केट चालू आहे मांस विक्री रस्त्यावर होत आहे. ते बंद करावे.

मा.महापौर :अनधिकृत रित्या शहरात कोठेही मटनमार्केट चालू असेल व विक्री होत असेल व त्यांच्याकडे परवानगी नसेल तर या संदर्भात प्रशासनाने दखल घ्यावी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खान : अनधिकृतपणे विक्री करणारे यांना परवानगी देवून रेग्यूलर करण्यात यावे .

मा.महापौर : महानगरपालिकेने काही ठिकाणी परवानगी दिलेली आहे संबधीताने परवानगी साठी मा.आयुक्त यांचेकडे अर्ज करावा नियमात बसत असेल तर प्रशासनाने परवानगी दयावी.

श्री.अ.रशिद खान : अनधिकृत मटन मार्केट कुठे आहे या शहरात डुक्कर ,बकरा, कोंबडा यांची कत्तल होते.

मा.महापौर : मटन मार्केट कोणतेही असेल, विनापरवाना विक्री होत असेल त्या सर्वांवर कार्यवाहीचे प्रशासनास आदेश केलेले आहे.

श्री.संजय जोशी : लहान जनावर तसेच मोठे जनावर यांची कत्तल करण्यासाठी प्रशासनाने स्लाटर हाऊस नेमलेले आहे त्याच ठिकाणी ते कापले जावे परंतू शहरात नाल्याच्या कडेला दुकाने असून नाल्यात कत्तल केली जाते व बाजूला विक्री केली जाते व नाल्यामधे ती घाण टाकली जाते त्यामूळे आजूबाजूच्या नागरीकांना त्याची दुर्गंधी येते. व त्रास होतो.

मा.महापौर :स्लाटर हाऊस मधेच जनावरे कापले जातात की त्या व्यतिरिक्त शहरात इतर ठिकाणी कापले जातात याचा खुलासा करावा.

संचालक,पशुसंवर्धन :पडेगाव येथे मोठे जनावरांसाठी व शहाबाजार येथे लहान जनावरांसाठी असे दोन कत्तल खानेआहे.पडेगांव येथील कत्तलखान्यासाठी भारत सरकारकडून २.२४ कोटी प्रोजेक्ट मंजूर झालेला असून टोकन ग्रॅण्ड म्हणून १० लक्ष रक्कम महानगरपालिकेस मिळालेली आहे.

मा.महापौर :जो प्रश्न विचारलेला आहे त्याचाच खुलासा करावा.

श्री.जोशी संजय : जळगाव रोड, चिकलठाणा जालना रोडवर बोकडची विना परवानगी कत्तल केली जाते. तसेच शहरात इतरही बऱ्याच ठिकाणी लहान जनावरांची कत्तल केली जाते.याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

मा.महापौर :अनधिकृत रित्या शहरात कोठेही जनावरे कापली जाणार नाही व ते मांस विक्री होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.सलीम खान :बाजाराचा ठेका महानगरपालिके मार्फत चालविला जात आहे. वसुलीत पूर्वीपेक्षा वाढ झालेली आहे का?

मा.महापौर :लेखी स्वरूपात पत्र देवून प्रशासनाकडून माहिती घ्यावी.

**<u>विषय क्र. ६०/१ :</u>**

दिनांक २६/०७/२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :विषय क्र १ हा इतिवृत्त कायम करण्याचा राहील परंतू यापूढे विषय पत्रिकेवर विषय क्र २ हा मागिल बैठकीत ज्या ज्या सुचना केलेल्या होत्या त्या बाबतीची कार्यवाही झालेली आहे का किंवा झालेली नाही किंवा होणार आहे . या संबधीची माहिती असावी अशी माझी सूचना आहे.

मा.महापौर :प्रशासनाने या सूचनाची दखल घ्यावी.

श्री.कोकाटे काशिनाथ :उदया गणपती विसर्जन आहे सर्वांना आज आरती व इतर कार्यक्रमासाठी जायचे आहे विषयपत्रिका घेण्यात यावी.चर्चेसाठी नंतर वेळ देण्यात यावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे :नवीन वार्ड कार्यालय झाले एका वार्ड कार्यालया अंतर्गत १६ ते १७ वार्ड येतात वार्ड क्र. ९० मध्ये साफसफाई साठी मजूर नाही, कचरा उचलण्यासाठी गाडी नाही, हात गाडया नाहीत या संबधी खुलासा दयावा वर्ग-४ चे कर्मचारी यांचे बदल्या करून नागरीकांची गैरसोय झालेली आहे स्वच्छता झाली पाहिजे.

मा.महापौर :स.सदस्यांनी केलेली सुचना विचारात घेऊन प्रशासनाने चौकशी करून कार्यवाही करावी विषय क्र १ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक २६/०७/२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ६१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे आदेश क्र. संलेको-११.०४/ प्र.क्र.१८४/ २००४/ कोषा प्रशा-१, मंत्रालय, मुंबई दि.३०.०६.२००५ नुसार श्री.एस.एन.औताडे, कोषागार अधिकारी यांची मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर लोकहीत व प्रशासकीय कारणास्तव प्रतिनियूक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आली आहे.

करीता श्री.एस.एन.औताडे, यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२२/०७/२००५ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम दोन वर्ष किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियूक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

मा.महापौर : प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.एस.एन.औताडे, यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२२/०७/२००५ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम दोन वर्ष किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियूक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

सौ.लता दलाल :गणपती उत्सव चालू असून बऱ्याच ठिकाणी भंडाऱ्याचा कार्यक्रम असून शेवटचा दिवस आहे सर्वच स.सदस्यांना आपआपल्या वार्डात कार्यक्रमासाठी जायचे आहे ही सभा तहकूब करण्यात यावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती आहे.

मा.महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येते. सभेची वेळ व दिनांक सूचना काढून सर्वांना कळविण्यांत येईल.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.